# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**जावक क्रमांक :- २०२** **दिनांक :- २६/०७/२०२१**

## वेश्यागमनाकडे वळलेल्या ४ पिडीतांची वालीव पोलीसांनी केली सुटका- कारवाई दरम्यान २ आरोपींना अटक करुन घटनास्थळावरुन २,५३,४४०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त.

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २३/०७/२०२१ रोजी बातमी मिळाली की, मौजे पेल्हार गावातील खान कंपाऊंड मधील चाळीमध्ये एक तृतीयपंथी व एक परराज्यातील महीला रुममध्ये **कोरोना काळात बेरोजगारीतुन त्रस्त असलेल्या** तरुण मुली ठेवुन त्या पुरुष गि-हाईकांना वेश्यागमनाकरीता पुरवुन सदर ठिकाणी वेश्याव्यवसाय चालवित आहे, अशी खात्रिशीर बातमी मिळाल्याने सदर बातमीचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शन व कारवाई पुर्व परवानगी घेवुन श्री. मिलिंद साबळे, पोलीस निरीक्षक व वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व पुरुष/महीला अंमलदार यांनी बातमीची खात्री करणे कामी सापळा पुर्वी डमी गि-हाईक पाठविले असता सदर ठिकाणी बातमीप्रमाणे वेश्याव्यवसाय चालविला जात असल्याची खात्री झाली. त्याआधारे सदर ठिकाणी छापा कारवाई केली असता सदर चाळीतील बंद खोलीमध्ये बातमी प्रमाणे १. वसुंधरा संजय तिवारी व २. सौ. अंजली राजकुमार यादव उत्तरप्रदेश येथील राहणारी महीला मिळुन आली. घटनास्थळावरील घराची झडती घेतली असता आतील खोलीमध्ये अंदाजे २५ ते ३० वयो गटाच्या चार पिडीत मुली मिळुन आल्या. पिडीत मुलींकडे चौकशी केली असता माहीती समोर आली की, गेले वर्षभरापासुन कोरोना सारख्या माहामारीमुळे उद्‌भवलेल्या बेरोजगारीतुन सर्व तरुण मुली वेश्यागमन सारख्या अनैच्छीक व्यवसायाकडे वळल्या होत्या व वरील दोन्ही आरोपी हे चारही पिडीत मुलींकरवी पैशांचा मोबदला देवुन वेश्यागमन करीत असल्याचे सांगितले. सदर घराची बारकाईने झडती घेतली असता **घरातुन २,५३,४४०/- रुपये किंमतीचे निरोध मिळुन आले.** सदर बाबत वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. ा ७०५/२०२१ भारतीय दंडसंहिता कलम ३७० (१), ३७० (३), ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियिम १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सर्व मुलींना ताब्यात घेवुन महीला सुधारगृह नागझरी बोईसर येथे ठेवण्यात आले आहे. दोन्ही आरोपीतांना कोर्टात हजर केले असता त्यांना दिनांक – २८/०७/२०२१ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पो.नि. साबळे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२, श्री. अमोल मांडवे, सहा.पो.आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वपोनि. श्री. विलास चौगुले, पोनि. श्री. राहुलकुमार पाटील, श्री. मिलिंद साबळे, तसेच गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि. ज्ञानेश फडतरे, पो.अंम. योगेश देशमुख, मनोज मोरे, मुकेश पवार, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, अनिल सोनवणे, राजेंद्र फड, विनेश कोकणी, सचिन बलीद, बालाजी गायकवाड यांनी केली आहे.

----oooo----